# ।। ॐ श्री साईराम।।

# प्रशांती संदेश – ८५

प्रशांती संदेशाच्या ८५ व्या भागात आपणा सर्वांचे स्वागत असो.

आजच्या भागाचा विषय आहे, प्रेम करा, भिऊ नका. आपण असे म्हणू शकतो, केवळ प्रेम करा, कधीही भिऊ नका. ह्या विषयाशी संबंधित आपण आता काही मुद्यांवर चर्चा करूया.

आपल्या जीवनातील बहुतांश व्यवहार भीतीवर आधारित असतात. एवढेच नव्हे तर देवाच्या बाबतीतही आपण भयग्रस्त असतो. दुसऱ्या बाजूस काहीजण म्हणतात 'देवाची भीती बाळगा. त्यात शहाणपण आहे.' समाजाच्या एका भागानुसार देवाची भीती हे ज्ञान आहे. परंतु माझा असा प्रश्न आहे की जर तुम्हाला देवाची भीती वाटत असेल तर तुम्ही त्याच्याशी जवळीक कशी साधू शकणार? त्याच्या निकट कसे जाणार? तुम्ही त्याला तुमचा पिता, तुमची माता, तुमचा सखा, गुरू कसा मानणार? त्या भावनेतून त्याच्याकडे कसं पाहू शकणार?

जेव्हा तुम्ही 'माता पिता गुरू दैवम मरिअन्तयु नीवे' असं म्हणता. त्याचा अर्थ साकल्याने विचार करता, तुम्हाला त्याच्यावर प्रेम करणे जरुरीचे आहे. तुमच्या मनात त्याच्याविषयी भय असू शकत नाही. म्हणून आपण देवाची भीती बाळगणारा ह्याऐवजी प्रीती करणारा असे म्हणूया. त्याचे कारण आहे प्रेम ईश्वर आहे, ईश्वर प्रेम आहे. परमेश्वराची अनुभूती देणारा प्रेम हा एकमेव मार्ग आहे. 'सर्वांवर प्रेम करा, सर्वांची सेवा करा.'' हा परमेश्वराप्रत घेऊन जाणारा एकमेव मार्ग आहे असे भगवान सांगतात.

म्हणून, आपण मनात भय न बाळगता प्रेम केले पाहिजे आणि एवढेच नव्हे तर तो देतो आणि क्षमा करतो मग भीती बाळगण्याची गरज काय? परमेश्वर तुमच्या दोषांच्या आधारे नव्हे तर तुमच्या गुणांच्या आधारे तुमची कदर करतो. भय वाटण्याची गरजच नाही. आपला भगवंत किती कनवाळू आहे! किती दयाळू आहे. आपले भगवान बाबा! प्रेमाने ओतप्रोत भरलेले! म्हणून सुरुवातीलाच मी हे स्पष्ट करू इच्छितो की देव प्रीती अत्यंत महत्त्वाची आहे. यत्किंचितही देवाची भीती बाळगू नका. का?

भगवानांनी स्पष्टपणे म्हटले–

प्रेम हे त्याचे स्वरूप आहे आणि तो पूर्णत: प्रेमाने व्याप्त आहे.
केवळ या प्रेमाद्वारेच तुम्ही त्याच्याशी जोडले जाणे शक्य आहे.
म्हणून जर तुम्हाला हे प्रेम मुबलक प्रमाणात मिळाले.
तुम्ही त्या अद्वैताच्या अनुभूतीसाठी, अद्वैतावस्थेसाठी पात्र ठरता असे भगवान म्हणतात
शिवाय, जेव्हा आपण त्यांची घोषणा ऐकतो तेव्हा तेथे भीतीला आजिबात वाव नाही.
त्याचे नेत्र करुणेने पूर्ण भरलेले आहेत.
त्याचे शब्द आल्हाददायक अमृत आहे.
चेहऱ्यावर मंदस्मित आणि त्याचे मधुर भाव
ते आपल्याला परमानंद देतात. असं स्वामी म्हणतात.

म्हणून जेव्हा आपल्या प्रभूची दृष्टी पूर्णत: करूणामय आहे, शब्द माधुर्याने ओथंबलेले आहेत; मुखावरील मंद स्मित अमृतासम आहे जे आपल्याला परमानंद प्रदान करते, ते आपल्या मनात कधीही त्याच्याविषयी भय निर्माण होऊ देणार नाही. आपल्याला त्यांची आजिबात भीती वाटणार नाही. म्हणून त्यांच्यावर प्रेम करा. प्रेम हाच एकमेव मार्ग आहे. म्हणून ह्या भाषणाचे शीर्षक 'केवळ प्रेम आणि भय नाही' असे आहे. आपल्याला हे सत्य कसं ओळखता येत नाही? ह्यावर आपण चर्चा करू या.

आपलं जीवन यांत्रिक झालं आहे. आपलं संपूर्ण जीवन जवळजवळ मशीनसारखं झालं आहे. आपल्याकडे

असणाऱ्या शिक्षणाची वा तंत्रज्ञानाची जी यंत्रणा असते त्या यंत्रणेवर यश अवलंबून असते. जुन्या पुराण्या गोष्टीच आपण महत्त्वाच्या मानतो. आपलं ज्ञान आणि स्तृतींनुसार आपण चालतो. ह्या गोष्टींमुळे आपण यांत्रिक बनतो. आपले जीवन यंत्रवत् बनते. सर्व काही रुटीनप्रमाणे चालते. ही सवयीची बाब असते. त्यामध्ये काहीही सर्जनशीलता नाही, नावीन्य नाही. स्वत:चे असं काही नाही. हे दुष्टचक्रासारखं आहे. आपण ते सत्य जाणण्याची उमेद कशी बाळगू शकतो जे नित्यनूतन, टवटवीत आणि आल्हाददायक असते?

शिवाय या यांत्रिक जीवनाने आपल्याला जीवनाला काय दिले? जीवन यांत्रिक आहे. त्यांनी आपल्या जीवनात कशाची भर घातली? आशा, क्रोध, वैफल्य, इच्छा आणि विषयलोलुपता याशिवाय अधिक काही नाही. हे सर्व यांत्रिक, यंत्रवत् जीवन आहे. हेच त्याचं एक कारण असू शकेल की आपण प्रेम समजू शकत नाही तथापि आपल्या मनात सदैव एक भीती असते की हे यंत्र बंद पडेल किंवा कोणत्याही क्षणी त्याला दुरूस्तीची आवश्यकता भासू शकेल. म्हणून स्वामी म्हणतात की आपण नेहमी रडगाणं गात असतो का? निरर्थक रडगाणं!

जन्मवेळी प्रत्येक शिशु रडतो

मृत्यू झाल्यावर, बाजूला असणारे सर्वजण रडतात

दरम्यानच्या काळात, विविध मुद्द्यांसाठी, विविध बाबींसाठी व विविध समस्यांसाठी आपण रडत असतो.

संपूर्ण जीवन यंत्रवत् झाले आहे. आता करायचं काय? कदाचित आपण गाढ झोपेत असल्यामुळे प्रेम ओळखू शकलो नाही. म्हणून आपल्याला वास्तविकता माहीत नाही. जोपर्यंत आपली जाणीव विकसित होत नाही तोपर्यंत आपण प्रेमाला जाणू शकणार नाही. आपल्यामधील आंतरिक जाणीव जागृत झाली पाहिजे. परंतु हे यंत्र आपले जीवन केवळ तात्त्विक चिंतन करणे जाणते. कृत्रिम बुद्धिमत्ता बाकी काही नाही.

अशा ह्या परिस्थितीतून बाहेर काढण्यासाठी, ह्या बंदिवासातून आपल्याला बाहेर काढण्यासाठी आपले दिव्य सद्गुरू, भगवान बाबा आपल्या जीवनात आले. ह्या बंदिवासातून ते कसे आपल्याला बाहेर काढतात? त्याचं कारण आहे ते आत्मज्ञानी आहेत, जागृत आहेत. म्हणून आपण 'सच्चिदानंद समर्थ सद्गुरू राजाधिराज योगिराज' असे म्हणतो. सच्चिदानंद! त्यांच्या सत्चित्आनंदामुळे, ते अत्यंत सक्षम आहेत, सामर्थ्यशील आहेत. ते त्यागाचे विरक्तीचे प्रतीक आहेत आणि म्हणून ते तुम्हाला भीतीच्या बंदिवासातून बाहेर काढून प्रेमाचा मार्ग दर्शवितात.

भगवान बाबांनी पुढे एक कार्यतंत्र दिले आहे, एक साधनही दिले आहे. त्यांनी दिलेले ते साधन कोणते आहे? त्यांनी आपल्याला संघटनेची भेट दिली आहे. सर्वत्र पसरलेल्या साई केंद्रांनी मिळून बनलेली सत्यसाई संघटना. आपल्या परमेश्वराचे स्तुतीगान आणि नामस्मरण करून आपण त्या केंद्रांशी जोडले जातो. आपण सर्वजण मिळून सेवाकार्य करतो तसेच आपण साधना शिबिरे, आध्यात्मिक शिबिरे आयोजित करून सामूहिक ध्यान करतो. ह्या सामूहिकतेतून आपल्या ऊर्जेचा संचय होतो. तेथे ऐक्य असते, समग्रता असते. अशा प्रकारे भगवान बाबांनी आपल्यासाठी एक सुंदर कृती-योजना तयार केली. त्यांनी आपल्याला ह्या साई संघटनेशी जोडले. जेथे आपण सामूहिकरित्या कार्य करण्यास शिकतो, भीतीमुक्त होण्यासाठी आणि प्रेम करण्यासाठी एकमेकांना प्रेरित करतो. आपण शारीरिक व मानसिक पातळीवरून कार्य करतो त्यामुळे हे आपल्याला माहीत नसण्याचे तिसरे कारण असू शकते. जीवन म्हणजे दुसरे काही नसून देह आणि मन आहे असा आपण विचार करतो. नाही! मन काय ग्रहण करते? मनामध्ये काय असते? जे श्रवण केले आहे, जे धर्मग्रंथात वाचले आहे, जे आपल्या स्मृतींमध्ये आहे, ज्या सवयी आपण लावून घेतल्या आहेत. परंपरा, अभ्यास व संप्रदाय ह्याच्या नावाखाली येणारे सर्व काही.

आपण देहाची स्थिती केवळ मानसिक पातळीवर ठेवतो. परंतु हे मन इतकं छोटं आहे हे आपण विसरता कामा नये. त्यामध्ये गंगेसारखी नदी समाविष्ट होऊ शकत नाही. शक्यच नाही! का? कारण सत्य, दिव्यत्व हे

मनाच्या पलीकडे आहे.

यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसासह

जग आणि मन दोन्ही रिक्त हस्ते व्यर्थ परत येते कारण दोघांनाही सत्य वा वास्तव जाणणे शक्य होत नाही.

ह्याशिवाय मन सतत प्रत्येक गोष्टीची कारण मीमांसा, युक्तिवाद करत असते. त्याला स्वत:च्या पद्धतीचे, स्वत:च्या मताचे, स्वत:च्या युक्तिवादाचे समर्थन करायचे असते. आपलं मन स्थिर नसते, निश्चल नसते. आपले मन निर्मळ नसते. त्यावर मळभ असते. ते मेघ असतात इच्छांचे, महत्त्वाकांक्षांचे, स्वप्नांचे, कल्पनांचे.

जेव्हा आपल्या मनावर मळभ असते तेव्हा आपल्याला मनाच्या मागे वा मनाच्या पलीकडे असणारा चैतन्यरूपी सूर्य दिसू शकत नाही. आपण कधीही सत्याच्या सन्मुख जाऊ शकत नाही. मग ह्यासाठी कोणता मार्ग आहे? तर ध्यान हा एकमेव मार्ग आहे. ध्यान म्हणजे काय? उन्मन अवस्था. नाही! चैतन्याचे तेज अनुभवण्यासाठी आणि चैतन्याची जणीव असण्यासाठी मनाला आवर घालणे, मनोनाश हा एकमेव मार्ग आहे.

ह्या सगळ्यासाठी आता आपण काय करणे गरजेचे आहे तर आपल्यामध्ये तरुणांसारखा जोश असायला हवा. आपण मनाने तरुण असायला हवे. आपण अनेक तरुण लोक पाहतो ज्यांची मनं थकली आहेत तसेच अनेक वृद्ध लोक पाहतो ज्यांची मनं तरुणांसारखी जोशपूर्ण आहेत. म्हणजेच वृद्ध आणि तरुण ही वयाची बाब आहे; मला त्या अर्थाने म्हणायचे नाही. मी आपल्या मनाच्या दृष्टिकोनातून बोलतो आहे. तरुण मन म्हणजे काय? तरुण मन धाडसी असते, त्याच्याकडे ऐकून घेण्यासाठी संयम असतो, ते कार्यवाही करण्यासाठी तत्पर असते. अनंत विश्वाची ही युवावस्था आहे. ह्याचीच आपल्याला गरज आहे. परंतु आपले वृद्ध मन निरंतर शोध घेत राहते आणि विषयांच्या कल्पनासृष्टीत बुडून जाते. अखेरीस, त्याच्या हाती काहीही लागत नाही.

नित्य नूतन सत्य जाणण्यासाठी, आपलं मन तरुण असायला हवं. आपल्यामध्ये तरुणांसारखा जोश असायला हवा. जेव्हा आपल्या मनात, धर्मग्रंथावर आधारित माहिती, समजुती, तत्त्वज्ञान वा धर्म, विशिष्ट मतप्रणाली, सिद्धांत ह्यासारखे काही नसते तेव्हा आपल्या दृष्टीमध्ये स्पष्टता असते. कारण ह्या सर्व गोष्टी म्हणजे मनात गर्दी करणारे ढग आहेत. ते निघून गेल्याशिवाय आपल्याला स्पष्टता प्राप्त होत नाही.

पुढे आपण परमेश्वराची आपली व्याख्या देतो. आपल्याला दिव्यत्व स्पष्ट करून सांगायचे असते. किती मूर्खपणा आहे हा! उपनिषदांमध्ये स्पष्ट सांगितले आहे की तुम्ही त्याचे स्पष्टीकरण देऊ शकत नाही कारण ते स्पष्टीकरणाच्या आणि विचारांच्या पलीकडे आहे. ते आपण परिभाषित करू शकत नाही कारण ते शब्दांच्याही पलीकडे आहे. म्हणून त्यांना परिभाषित करू नका. त्यांचे विवरण करू नका. जीवन जगताना, आपण आपल्या अंतर्यामी परमेश्वराची अनुभूती घेऊ शकतो. आपल्यामध्ये असणाऱ्या परमेश्वरासारखे जीवन जगा आणि परमेश्वरावर प्रेम करा. अखेरीस परमेश्वर बना. हे आपलं अंतिम ध्येय असायला हवं. मग आपलं आपल्याला समजेल की प्रेम हाच परमेश्वर आहे त्यामुळे आपल्याला त्याचे भय वाटण्याचं काही कारण नाही. वास्तविक प्रेम हाच खरा धर्म आहे. भीती नव्हे. म्हणून स्वामी म्हणतात, ''तेथे एकच धर्म आहे, प्रेमाचा धर्म.''

कोणत्या प्रकारचे प्रेम? प्रेम जे नूतन आहे, ताजे, टवटवीत आहे, जे नुकतेच उद्‌भवले आहे. ते अद्‌भूतरम्य प्रेमासारखं ताजं टवटवीत असायला हवं! अद्‌भूतरम्य प्रेम, म्हणजेच श्रीकृष्णाची रासलीला, चैतन्य, रामकृष्ण परमहंसांचे हर्षोत्फुल्ल प्रेम. विश्वातील प्रत्येक जण ह्या प्रेमाची मागणी करत असतो, हे प्रेम प्राप्त करण्याची त्याला इच्छा असते. आपल्याला हे ज्ञात झाले पाहिजे की धर्म म्हणजे प्रेम ह्या प्रकारची जाण निवडक थोड्या लोकांना दिली आहे, असं भगवान श्री सत्यसाईबाबांचे भक्त म्हणतात कारण भगवान नेहमी प्रेमावर विशेष भर देतात. त्यांच्या प्रवचनाची सांगता ते ''प्रेम मुदित मन से कहो राम, राम राम'' ह्या भजनाने करतात. ''प्रेम मुदित मन से कहो'' असं ते म्हणतात.

म्हणून साईभक्तांनी कधीही त्यांच्याविषयी भय न बाळगता परमेश्वरावर प्रेम करायला हवे हे जाणले पाहिजे.

अन्य माशी वा कीटक न बनता आपण मधमाशीसारखे बनून दिव्यत्वाच्या कमलपुष्पामधून प्रेमाचा मध शोषून घेतला पाहिजे. हे करण्याची आवश्यकता आहे.

आणि नंतर ह्या प्रेम मार्गाद्वारे, भीती नव्हे तर प्रेम हाच एकमेव मार्ग आहे हे जाणून घ्या. हे 'प्रेम' जे आपण आहोत ते आपल्याला ह्या निष्कर्षाप्रत आणेल की बीजरूपाने आपण अस्तित्वात आहोत. बीज अंकुरित झालेले नाही. त्याचे रोप तयार झालेले नाही व त्याचा वृक्षही झालेला नाही. बीज रूपातच आपले अस्तित्व चालू राहते.

ह्या बीजामध्ये एक वृक्ष बनण्याची सर्व क्षमता असते, ते त्याचे नैसर्गिक सामर्थ्य आहे. ते बीज नुसते बीज नसते तर त्यातून त्यामध्ये वृक्ष निर्माण करण्याची क्षमता असते. आपण त्या वास्तविकतेच्या अवस्थेप्रत आलो नाही की आपण आपल्या क्षमतेने आपण वास्तव निर्माण करू शकू. दुसऱ्या बाजूने आपण भौतिक विश्व आणि कुटुंब ह्यांच्या चक्रामध्ये फसलो आहोत, त्यामुळे आपण चैतन्यस्वरूप आहोत ह्याचा आपल्याला बोध झालेला नाही. आणि एकदा आपल्याला त्या चैतन्याची जाण झाली की मग तुम्ही आणि वृक्ष, तुम्ही आणि पशू, तुम्ही आणि पर्वत यामध्ये काहीही भेद राहत नाही.

म्हणून स्वामींनी म्हटले आहे - पुट्ट-वारूळ, चिट्टु-वृक्ष, गुट्टा-पर्वत, पिट्टा-पक्षी.... पर्वत, पक्षी, वारूळ, वृक्ष हे सर्व दिव्य आहे. तुम्ही त्यांना निर्जीव वा अचेतन वस्तू समजू नका. का? कारण आपण हे चांगले जाणतो की संपूर्ण सृष्टी दिव्य आहे.

संपूर्ण सृष्टी दिव्यत्वाचे स्वरूप आहे आणि त्या दिव्यत्वावस्थेत आपण पूर्ण चंद्राचा आनंद लुटू. सूर्योदय पाहताना आपण त्यामध्ये दंग होतो. पर्वताच्या गुहेमध्ये बसूनही सौंदर्य पाहू शकतो. बाळलीला पाहताना आपण त्यामध्ये हरवून जातो कारण ते सर्व दिव्य आहे. म्हणून प्रेम अचेतन वस्तूचे चेतनेत परिवर्तन करते, रूपांतर करते. हो. हे प्रेमाचे सामर्थ्य आहे, शक्ती आहे.

अनेकानेक धन्यवाद! परमेश्वरावर प्रेम करा, त्याची भीती बाळगू नका ह्यावर पुन्हा एकदा जोर देऊन मी तुमची रजा घेतो.

साईराम.

***